| MHSN030013112025 | **म.सं.कौ.हिं.का. अर्ज क्र. ३४/२०२५ मधील निशाणी ५ खालील आदेश** **मनिषा सुपेकर वि. योगेश सुपेकर व इतर** |
|---|---|

प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून प्रतिबंधक अधिनियमचे कलम २३ अन्वये दाखल केलेला आहे.

२. अर्ज वाचला. अभिलेखावरील दाखल कागदपत्रे वाचले. युक्तिवाद ऐकला. अर्जदार यांचे मत्ता व दायित्वाचे प्रतिज्ञापत्र वाचले. कौटुंबिक घटना अहवाल अभिलेखावर दाखल नाही. गैरअर्जदार यांनी हजर राहून देखील त्यांचे म्हणणे दिले नसल्याने त्यांचेविरुद्ध म्हणणे नाही असा आदेश दि. १०.१२.२०२५ रोजी पारित करण्यात आला.

३. अर्जदाराच्या कथनांप्रमाणे दि. ३०.०५.२०१४ रोजी तिचा व जाबदार क्र. १ यांचा विवाह सातारा येथे हिंदू विवाह धर्मशास्त्र जाती रितीरिवाजाप्रमाणे, रूढी परंपरेनुसार एकमेकांच्या संमतीने संपन्न झाला. सदरील विवाहाचा संपूर्ण खर्च हा अर्जदार व जाबदार यांनी निम्मा–निम्मा करण्याचा ठरला होता. त्याप्रमाणे त्यांनी तो खर्च केला.

४. अर्जदाराचे पुढील कथन असे की, लग्नानंतर अर्जदार ही जाबदारांकडे राहण्यास गेली. त्यावेळी जाबदार हे एकत्रात राहण्यास होते. लग्नानंतर काही दिवसात जाबदार क्र. १ याने अर्जदाराला तुम्ही लग्न व्यवस्थित करून दिले नाही, आमचा मानपान केला नाही असे बोलून तिला छळू लागले. त्याला जाबदार क्र. २ ते ४ यांची फूस होती. अर्जदाराची माहेरची परिस्थिती गरिबीची होती. त्यामुळे जाबदार आज ना उद्या त्यांची वर्तणूक सुधारेल या आशेवर अर्जदार त्यांच्यासोबत राहत होत्या. जाबदार क्र. १ याने रिक्षा घ्यावयाची आहे त्यासाठी तू तुझ्या वडिलांचे कडून पैसे घेऊन ये असा तगादा लावला.

ज्यावेळी अर्जदाराने तिच्या माहेरची गरीब परिस्थिती असल्याचे जाबदारांना समजावून सांगितले. तथापि त्याचा त्यांच्यावर कोणताही परिणाम झाला नाही व त्यांनी अर्जदाराचा छळ चालूच ठेवला. तसेच अर्जदाराला फोन आला तर तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन जाबदार हे अर्जदाराचा छळ करू लागले. दरम्यानच्या काळात जाबदार क्र. १ हा दारू पिऊ लागला व दारू पिल्यानंतर अर्जदाराला मारहाण करून घराबाहेर काढू लागले. त्याबाबत अर्जदाराने आईवडिलांना वरील सर्व गोष्टीची कल्पना दिली. अर्जदाराचे आईवडील जाबदारांचेकडे येऊन त्यांना तसे न वागण्यासंबंधी सूचना दिल्या. परंतु जाबदार क्र. १ मध्ये काहीही फरक पडला नाही.

५. अर्जदाराचे पुढील कथन असे की, अर्जदार गरोदर असताना तिची काळजी न घेता जाबदारांनी तिचा छळ चालूच ठेवला. अर्जदाराच्या बाळंतपणासाठी सातव्या महिन्यात अर्जदाराची आई आणि मावशी तिला नेण्यासाठी आल्या व ते तिला सांगलीला घेऊन आल्या. त्याचदिवशी संध्याकाळी जाबदार क्र. १ याने अर्जदाराला फोन करून, तिची आई व मावशीवर चोरीचा आरोप केला. दि. १२.०५.२०१५ रोजी अर्जदाराने मुलगी अर्पिताला जन्म दिला. तिला पाहण्यासाठी जाबदार आले नाहीत. याउलट तिच्या बारशाच्या कार्यक्रमाला चोरीच्या घटनेवरून दंगा केला.

६. अर्जदाराचे पुढील कथन असे की, त्यानंतर अर्जदार पुन्हा सातारा येथे जाबदारांच्या घरी राहण्यास गेल्या. त्या काळातही जाबदार क्र. १ चे वर्तणुकीत कोणतीही सुधारणा नव्हती. जाबदार क्र. १ चे एका महिलेशी अनैतिक संबंध असून ते तिच्यासमवेत राहत असल्याचे अर्जदाराला समजले. त्यावेळी अर्जदाराने जाबदाराला समजावून सांगितले. तथापि जाबदारांनी त्याकडे दुर्लक्ष केले.

७. अर्जदाराचे पुढील कथन असे की, अर्जदार पुन्हा गरोदर राहिली. त्यावेळीही जाबदार तिला त्रास देत होते. एके दिवशी जाबदार क्र. १ ने अर्जदाराला त्रास दिल्यानंतर तिने सातारा येथील पोलीस स्टेशनमध्ये जाबदारांविरुद्ध फिर्याद नोंदवली. त्यावेळी सर्व जाबदारांना पोलीस स्टेशनमध्ये बोलावून पोलिसांनी त्यांना ताकीद दिली. त्यावेळी जाबदारांनी अर्जदाराला व्यवस्थित नांदवतील अशी हमी दिली. त्याचेवर विसंबून अर्जदार ही जाबदारांकडे परत नांदण्यास गेली.

८. अर्जदाराचे पुढील कथन असे की, वरील प्रकारानंतर २३ दिवसांत जाबदार क्र. १ याने अर्जदाराचा पुन्हा छळ केला. त्यावेळी इतर जाबदारांनीही जाबदार क्र. १ ची बाजू घेतली. त्यावेळी अर्जदाराने पुन्हा पोलीस स्टेशनला जाऊन फिर्याद करेल असे सांगितले. जाबदार क्र. २ ते ४ हे अन्य ठिकाणी राहण्यास गेलेनंतर जाबदार क्र. १ याने अर्जदाराला मारहाण करून घराबाहेर काढले. त्यामुळे अर्जदार ही पुन्हा सांगली येथे माहेरी आली व तेथे सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दि. ०२.०९.२०१७ रोजी मुलगा दुर्वांक झाला. अर्जदार ही सांगली येथे जाऊन राहिल्यानंतर जाबदारांनी अथवा त्यांच्या कुटुंबीयांनी अर्जदाराची किंवा मुलांची काहीही व्यवस्था केली नाही. अर्जदाराच्या आईवडिलांनी जाबदारांच्याकडे जाऊन जाबदार क्र. १ याला सांगली येथे राहण्यासाठी घेऊन आले व त्यांना राहण्यासाठी खोली भाड्याने घेऊन दिली. परंतु त्या ठिकाणी ही जाबदार व्यवस्थित राहिले नाहीत व ते दारू पिऊन अर्जदाराला मारहाण करू लागले व त्रास देऊ लागले.

९. अर्जदाराचे पुढील कथन असे की, जाबदार क्र. १ च्या आग्रहावरून व जाबदार क्र. २ च्या सांगण्यावरून अर्जदार ही पुन्हा सातारा येथे राहण्यास गेली व तेथे जाबदार क्र. १ सोबत स्वतंत्रपणे राहू लागले. त्यावेळी अर्जदार ही दुसऱ्यांच्या घरी भांडी काम करण्यास जात होती. त्यावेळी जाबदार क्र. १ याने अर्जदाराला दारू पिऊन पैशासाठी मारहाण करू

लागले व तिला घराबाहेर काढले. त्यानंतर अर्जदार तेथून निघून येऊन सांगली येथे राहू लागल्या. अर्जदाराची दोन्ही मुले शाळेत शिक्षण घेत असून त्यांच्या पोटापाण्याची अथवा कशाचीच जाबदार क्र. १ याने चौकशी केली नाही. त्यामुळे अर्जदार ही तिच्या मुलांना घेऊन तिच्या आईवडिलांच्या घरी आश्रितासारखे जीवन जगत आहे. अर्जदाराला जाबदार क्र. १ याने सांभाळण्यास नकार देऊन तिचे जीवन अंधकारमय केलेले आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज तिने न्यायालयात दाखल करून अंतरिम पोटगी म्हणून दरमहा रक्कम रू. ४०,०००/- स्वतःकरिता व मुलांकरिता व स्वतःचा व मुलांचा वैद्यकीय खर्च म्हणून दरमहा रक्कम रू. १०,०००/- तसेच घरभाडे म्हणून दरमहा रक्कम रू. १०,०००/- मिळावे अशी मागणी केलेली आहे.

१०. अर्जदाराने तिच्या अर्जातील कथनांच्या समर्थनाकामी प्रतिज्ञापत्र व काही कागदपत्रे दाखल केलेली आहेत. तसेच अर्जदाराने कागदपत्रापैकी विवाह प्रमाणपत्र, फोटो, अर्जदार व जाबदार क्र. १ यांच्या मुलांचे जन्म प्रमाणपत्र व आधार कार्डाची छायांकीत प्रत दाखल केले आहे.

११. अंतरिम पोटगीचा अर्ज निकाली करतेवेळी असा अर्ज प्रतिज्ञापत्रासोबत दाखल केला आहे का हे पाहणे गरजेचे आहे. प्रस्तुत प्रकरणात अर्जदाराने तिच्या अर्जातील कथनांच्या समर्थनाकामी प्रतिज्ञापत्र व कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे. जाबदार व अर्जदार यांचे कथनांचे अवलोकन केले असता अर्जदाराने तिला झालेल्या त्रासाबाबत पोलिसात तक्रार दिलेली दिसून आहे. मात्र सदरील तक्रारीची प्रत अभिलेखावर दाखल नाही. जाबदार यांनी देखील न्यायालयात हजर राहून अर्जदाराची कथने नाकारलेली नाहीत. याउलट अर्जदाराच्या कथनांप्रमाणे ती व तिची मुले ही जून २०२२ पासून विभक्त राहत आहेत, मात्र सदर कालावधीमध्ये जाबदार यांनी अर्जदार व तिच्या मुलांचा शारीरिक,

मानसिक अथवा आर्थिक भार घेतलेला नाही असे प्रथमदर्शनी दिसून येते. वरील कारणास्तव प्रथमदर्शनी अर्जदार ही कौटुंबिक हिंसाचाराची पिडीता आहे हे शाबीत होते.

१२. अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये सध्या अर्जदाराची मुलगी अर्पिता ही सांगली येथील राणी सरस्वती कन्या शाळा येथे इयत्ता चौथी मध्ये शिकत आहे. तर मुलगा दुर्वांक हा सांगली येथील प्राथमिक मराठी शाळा क्र. १ येथे इयत्ता दुसरीमध्ये शिकत आहे. जाबदार क्र. १ याने अर्जदार व त्यांच्या मुलांची पोटापाण्याची कसलीही चौकशी अथवा व्यवस्था आजतागयात केलेली नाही. अर्जदार ही सध्या तिच्या आईवडिलांचे घरी आश्रितासारखे जिवन जगत आहे. सबब, जाबदार क्र. १ याची स्वतःची रिक्षा असून त्याला दररोज सर्व खर्च वजा जाता दोन ते अडीच हजार मिळतात. तसेच जाबदाराचे सातारा येथे वडिलोपार्जित घर असून त्यातील काही भाग त्यांनी भाड्याने दिला असून त्याला दरमहिन्याला रक्कम रू. १५,०००/- भाडे मिळते. सबब, प्रस्तुतचे अर्जाचा निकाल लागेपर्यंत दरमहा अंतरिम पोटगी म्हणून अर्जदार क्र. १ हिला रक्कम रू. २०,०००/-, अर्जदाराच्या मुलांना प्रत्येकी रक्कम रू. १०,०००/-, अर्जदार व तिच्या मुलांना वैद्यकीय व इतर खर्चासाठी दरमहा रक्कम रू. १०,०००/- व घरभाडे म्हणून दरमहा रक्कम रू. १०,०००/- इतक्या रकमेची मागणी केली आहे.

१३. अर्जदाराने तिच्या मत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अर्जदाराने तिच्या प्रतिज्ञापत्रामध्ये तिचा मासिक खर्च सर्वसाधारण १५,०००/- इतके नमूद केले आहे. तसेच तिच्यावर अवलंबून असलेल्या तिच्या मुलांचा दरमहा अंदाजे खर्च १० ते १५ हजार इतका असल्याचे नमूद केले आहे. मात्र अर्जदार ही सदरील खर्च कशाप्रकारे करत आहे याबाबत कोणतेही कथन केलेले नाही. तसेच तिने तिच्याकडे कोणताही उत्पन्नाचा स्त्रोत नसल्याचे नमूद केले आहे.

१४. वरील सर्व परिस्थितीचा एकंदरीत विचार केला असता व वाढत्या महागाईचा विचार केला असता अंतरिम पोटगीची रक्कम ही अर्जदाराच्या दैनंदिन गरजा पूर्ण करता येतील इतकी असावी असे या न्यायालयाचे मत आहे. जाबदार यांनी त्यांच्या उत्पन्नाबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर दिलेला नाही. अर्जदार ही तिच्या दोन अज्ञान बालकांचे सांभाळ करत आहे. त्यापैकी अर्पिता व दुर्वांक हे शिक्षण घेत आहेत. सबब, अर्जदार व तिच्यावर अवलंबून असलेल्या तिच्या दोन मुलांच्या दैनंदिन गरजा व वैद्यकीय खर्च याचा एकत्रित विचार केला असता जाबदार यांनी अर्जदार व तिच्या मुलांना दरमहा रक्कम रू.३,५००/– इतकी पोटगी देणे न्यायोचित होईल. अशी पोटगी अर्जदाराला अर्ज दाखल तारखेपासून देण्यात यावी.

१५. अर्जदाराने तिला घरभाडे म्हणून दरमहा रक्कम रू. १०,०००/– देण्यात यावे अशी विनंती केलेली आहे. अर्जदाराने तिच्या पूर्ण अर्जामध्ये तिला तिच्या माहेरपासून स्वतंत्र राहायचे आहे याबाबत कोणतेही कथन केले नाही. सबब अर्जदाराला आता तिच्या मागणीप्रमाणे असा आदेश देता येणार नाही.

वरील सर्व कारणांचा मी एकत्रित विचार केला असता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते–

## आ दे श

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. जाबदार क्रमांक १ याने प्रस्तुत अर्जाच्या दाखल तारखेपासून प्रकरण निकाली होईपर्यंत अर्जदार व तिच्या मुलांना दरमहा रक्कम रू. ३,५००/– इतकी अंतरिम पोटगी द्यावे.

३. अर्जदाराची घरभाडेची मागणी नामंजूर करण्यात येते.

४. अर्जदार आणि जाबदार हे ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहतात त्या संबंधित पोलीस ठाण्याला सदर आदेशाची प्रत पाठविण्यात यावी.

ROHINI SAMBHAJI PATIL
Digitally signed by ROHINI SAMBHAJI PATIL
Date: 2026.04.28 16:38:10 +0530

**सांगली.** **(रोहिणी सं. पाटील)**

**दिनांक – २८/०४/२०२६.** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (न्यायालय क्र.१),**

**सांगली.**

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same word for word as per original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | Shri. S. A. Jamadar |
| Court Name | : | Smt. R. S. Patil,<br>Judicial Magistrate First Class,<br>(Court no.1), Sangli. |
| Date of Order | : | 28/04/2026 |
| Order signed by Presiding Officer on | : | 28/04/2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 28/04/2026 |